खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिर

पुढारी

# राजगुरू महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराची सांगता

**राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर गुळाणी, (ता. खेड) येथे नुकतेच पार पडले. युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास अशी संकल्पना असलेल्या शिबिरात सुमारे १७५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ.एच.एम. जरे, सरपंच इंदुबाई ढेरंगे, उपसरपंच अनिता शिनगारे, ज्ञानेश्वर ढेरंगे, ग्रामसेवक अनिता अमराळे, मुख्याध्यापिका सविता गावडे आदी उपस्थित होते. ॲड. बुट्टे पाटील यांनी जीवनाला नेमकेपणाची दिशा देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. शिबिरकाळात स्वयंसेवकांनी सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, लोकशाहीतील सहभाग व जनजागृती, जलस्रोत व वृक्षारोपण, प्रधानमंत्री जनधन व विमा योजना, अन्न सुरक्षा जनजागृती, अपारंपरिक ऊर्जा स्रोत, वृक्षलागवड, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, महिला सबलीकरण, स्त्री-भ्रूणहत्या, ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका, आर्थिक स्वावलंबन अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले. शिबिराचा समारोप हिरामण सातकर यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी रासेयो पुणे जिल्हा समन्वयक डॉ. श्रीकांत फुलसुंदर उपस्थित होते. या शिबिरातील उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून राहुल खूशवाह आणि तनुजा कोहिणकर यांना गौरविण्यात आले.



**गुळाणी (ता. खेड) येथे विद्यार्थी श्रमदान करताना.**

My Gramin Edition
Dec 30, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

सकाळ

# गुळाणीत राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

**कडूस, ता. ३० :** "राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून आयुष्य समृध्दपणे कसे जगावे, याचे कौशल्य मिळत असते.विद्यार्थ्यांनी या शिबिराच्या माध्यमातून जीवनाला नेमकेपणाची दिशा देण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे," असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे यांनी गुळाणी (ता.खेड) येथे केले.

गुळाणी येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे सात दिवसांचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर उत्साहात पार पडले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ॲड. देवेंद्र बुट्टे बोलत होते.

'युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास' या संकल्पनेवर आधारित राबवलेल्या शिबिरात सुमारे १७५ स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



गुळाणी (ता. खेड) : शिबिरात श्रमदान करताना विद्यार्थी.

यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, डॉ. शिरीष पिंगळे, डॉ.एच. एम. जरे, सरपंच इंदूबाई ढेरंगे, उपसरपंच अनिता शिनगारे, ज्ञानेश्वर ढेरंगे, ग्रामसेवक अनिता अमराळे, मुख्याध्यापिका सविता गावडे, ज्ञानेश्वर पिंगळे, यशवंत पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिर काळात स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी गावातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, लिंगभाव संवेदनशीलता जनजागृती, लोकशाहीतील सहभाग व जनजागृती, जलस्त्रोत व वृक्षारोपण, प्रधानमंत्री जनधन व विमा योजना, अन्न सुरक्षा जनजागृती, अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत, वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, महिला सबलीकरण, स्त्री-भ्रूणहत्या, ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका, आर्थिक स्वावलंबन अशा विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन केले होते.

स्वयंसेवकांना योगेश्वर पाटील, डॉ.महेंद्र गरड, सचिन ढेरंगे, नीलेश पिंगळे, डॉ. संजय शिंदे, भूषण सांडभोर यांनी मार्गदर्शन केले. शिबिराचा समारोप संचालक हिरामण सातकर यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, डॉ. श्रीकांत फुलसुंदर उपस्थित होते. शिबिरात उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून राहुल खूशवाह, तनुजा कोहिनकर यांना गौरविण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, डॉ. कीर्ती नितनवरे, प्रा.अपर्णा कुलकर्णी, प्रा. नीलेश बारणे, प्रा. सागर थेऊरकर, प्रा. प्राची शिंदेकर, प्रा. सूरज गारगोटे, प्रा. जयश्री गोगावले, प्रा.कविता वाळुंज, प्रा. अक्षय खुर्पे, प्रा. राजकुमार मुंडे यांनी केले.

Pune, District-Today
31/12/2022 Page No. 3

# राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराची उत्साहात सांगता

**राजगुरुनगर (दै. संध्या) :**

येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर गुळाणी (ता. खेड ) येथे उत्साहात संपन्न झाले. 'युवकांचा ध्यास ग्राम–शहर विकास' अशी संकल्पना असलेल्या शिबिरात सुमारे १७५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.



शिबिराच्या उदघाटनप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, सरपंच इंदुबाई ढेरंगे, उपसरपंच अनिता शिनगारे, ज्ञानेश्वर ढेरंगे, ग्रामसेवक अनिता अमराळे, मुख्याध्यापिका सविता गावडे, ज्ञानेश्वर पिंगळे, यशवंत पिंगळे उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी आयुष्य समृध्दपणे जगण्याचे कौशल्य रासेयो शिबिरातून मिळत असून विद्यार्थ्यांनी या शिबिराच्या माध्यमातून जीवनाला नेमकेपणाची दिशा देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

शिबिर काळात स्वयंसेवकांनी गावातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, लिंगभाव संवेदनशीलता जनजागृती, लोकशाहीतील सहभाग व जनजागृती, जलस्रोत व वृक्षारोपण, प्रधानमंत्री जनधन व विमा योजना, अन्न सुरक्षा जनजागृती, अपारंपारिक ऊर्जा स्रोत, वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, महिला सबलीकरण, स्त्री–भ्रूणहत्या, ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका, आर्थिक स्वावलंबन अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले होते.

शिबिरातील स्वयंसेवकांना योगेश्वर पाटील, डॉ. महेंद्र गरड, सचिन ढेरंगे, निलेश पिंगळे, डॉ. संजय शिंदे, भूषण सांडभोर यांनी मार्गदर्शन केले.

शिबिराचा समारोप संचालक हिरामण सातकर यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, रासेयो पुणे जिल्हा समन्वयक डॉ. श्रीकांत फुलसुंदर उपस्थित होते. या प्रसंगी हिरामण सातकर यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, जिद्द, प्रामाणिकपणा, समर्पण आदि गुणांनी आपल्या आयुष्याला आकार द्यावा असे आवाहन केले.

या शिबिरातील उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून राहूल खूशवाह आणि तनुजा कोहिणकर यांना गौरविण्यात आले. शिबिराचे आयोजन रासेयो अधिकारी डॉ. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, डॉ.कीर्ती नितनवरे यांसह प्रा. अपर्णा कुलकर्णी प्रा. निलेश बारणे, प्रा.सागर थेऊरकर, प्रा. प्राची शिंदेकर, प्रा. सुरज गारगोटे, प्रा. जयश्री गोगावले, प्रा. कविता वाळुंज, प्रा. अक्षय खुर्पे, प्रा. राजकुमार मुंडे यांनी केले.

# राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराची सांगता

राजगुरुनगर
जनप्रवास, वार्ताहर

येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर गुळाणी (ता. खेड ) येथे उत्साहात संपन्न झाले. 'युवकांचा ध्यास ग्राम–शहर विकास' अशी संकल्पना असलेल्या शिबिरात सुमारे १७५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

शिबिराच्या उदघाटनप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, सरपंच इंदुबाई ढेरंगे, उपसरपंच अनिता शिनगारे, ज्ञानेश्वर ढेरंगे, ग्रामसेवक अनिता अमराळे, मुख्याध्यापिका



सविता गावडे, ज्ञानेश्वर पिंगळे, यशवंत पिंगळे उपस्थित होते.

अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी आयुष्य समृध्दपणे जगण्याचे कौशल्य रासेयो शिबिरातून मिळत असून विद्यार्थ्यांनी या शिबिराच्या माध्यमातून जीवनाला नेमकेपणाची दिशा देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

शिबिर काळात स्वयंसेवकांनी गावातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, लिंगभाव संवेदनशीलता जनजागृती, लोकशाहीतील सहभाग व जनजागृती, जलस्रोत व वृक्षारोपण, प्रधानमंत्री जनधन व विमा योजना, अन्न सुरक्षा जनजागृती, अपारंपारिक ऊर्जा स्रोत, वृक्ष लागवड, अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. शिबिरातील स्वयंसेवकांना योगेश्वर पाटील, डॉ. महेंद्र गरड, सचिन ढेरंगे, निलेश पिंगळे, डॉ. संजय शिंदे, भूषण सांडभोर यांनी मार्गदर्शन केले.

शिबिराचा समारोप संचालक हिरामण सातकर यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, रासेयो पुणे जिल्हा समन्वयक डॉ. श्रीकांत फुलसुंदर उपस्थित होते. या प्रसंगी हिरामण सातकर यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, जिद्द, प्रामाणिकपणा, समर्पण आदि गुणांनी आपल्या आयुष्याला आकार द्यावा असे आवाहन केले.

या शिबिरातील उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून राहूल खूशवाह आणि तनुजा कोहिणकर यांना गौरविण्यात आले. शिबिराचे आयोजन रासेयो अधिकारी डॉ. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, डॉ.कीर्ती नितनवरे यांसह प्रा. अपर्णा कुलकर्णी प्रा. निलेश बारणे, प्रा.सागर थेऊरकर, प्रा. प्राची शिंदेकर, प्रा. सुरज गारगोटे, प्रा. जयश्री गोगावले, प्रा. कविता वाळुंज, प्रा. अक्षय खुर्पे, प्रा. राजकुमार मुंडे यांनी केले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**